# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक ०७.०९.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १६ ईसमावर कारवाई करून एकुण ८१,१०१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करून एकुण १,७४,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५९८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ४,२४,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०६.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०७.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०४ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) नंदनवन पोलीसांची कामगिरी :— ई—रिक्षा चोरास अटक. एकूण ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०६.०९.२०२६ चे १२.३० ते १४.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी राकेश रामभाऊजी ठाकरे वय ३५ वर्षे रा. प्लॉट क्र. २२४, शारदा ले आऊट, खरबी, नागपूर यांनी त्यांची तीनचाकी ई—रिक्षा क्र. एमएच ४९ बीएम ५५१२ किंमती १,७०,०००/—रू. ची पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत, केडीके कॉलेज रोड, भगवती इलेक्ट्रानिक्स समोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद ईरिक्षा चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे तपासात, नंदनवन पोलीसांनी तांत्रिक तपास करीत असता, संघर्षनगर चौक येथे एका इसमाने ई—रिक्षा विक्रीकरीता आणला आहे अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून, ई—रिक्षा सह एका इसमास ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव राहुल उमाकांत ईटनकर वय ३१ वर्षे रा. दर्शन कॉलनी, गजानन मंदीराजवळ, नंदनवन, नागपुर असे सांगितले. त्यास ई—रिक्षा वाहनासंबंधी कागदपत्रे विचारली असता, त्याने कोणतेही कागदपत्र सादर केले नाही व नमुद ई—रिक्षा ही पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत, केडीके कॉलेज रोड, येथुन चोरी केल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेऊन अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयातील ई—रिक्षा व्यतिरिक्त पोलीस ठाणे नंदनवन हद्यीतुन १) पांढरी ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ बीएच ८७२४ किंमती ७०,०००/—रू. ची, २) फिक्कट पिवळया निळया रंगाची ई—रिक्षा क्र. एमएच ४९ बीएम ७९४५ कि. ८०,०००/— रु. ची ३) पांढरी ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४० बीएक्स ७१७९

किंमती ७०,०००/—रू. ची, ४) काळया ग्रें रंगाची स्प्लेंडर क्र. एमएच २७ डीएस ७१७६ किंमती ७०,०००/—रू. ची तसेच पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीतुन ५) हिरव्याा रंगाची ई—रिक्षा क्र. एमएच ४९ बीएम ३१४१ कि. ८०,०००/— रु. ची असे एकूण ०६ वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन एकुण ०६ वाहने` कि. ५,४०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कैलाश देशमाने, पोउपनि संतोषकुमार रामलोड, पोहवा दिनेश जुगनहाके, पोअं. प्रविण मरापे, राहुल खळतकर, सोमेश्वर घुगल व मपोहवा स्वाती कुंभरे यांनी केली.




**<u>३) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— दरोड्याचे प्रयत्नातील आरोपींना अटक. ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ०६.०९.२०२६ चे २३.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत विद्यानगर, पांधन रोड, शेतालगत मोकळया जागेत काही ईसम दरोडयाचे तयारीनिशी शस्त्रासह घात—पात करण्याच्या उद्देशाने जमलेले आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन, तेथे घेराव टाकुन, दरोड्याचे तयारीतील ०४ इसमांना ताब्यात घेतले व काही ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. ताब्यातील ईसमांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचें नांव १) बमबम राजेंद्र साह वय २५ वर्षे, रा. लक्ष्मीपुर जि. कटीयार, राज्य बिहार ०२) गगनकुमार शिवन साह वय २२ वर्षे, रा. मंडला टोला, लक्ष्मीपुर जि. कटीयार, राज्य बिहार ०३) भरतकुमार उपेंद्र साह वय ३२ वर्षे, रा. चमेली, लक्ष्मीपुर जि. कटीयार, राज्य बिहार ०४) राहुलकुमार चंदन साह वय २२ वर्षे, रा. मोरसंडा, लक्ष्मीपुर जि. कटीयार, राज्य बिहार असे सांगीतले. त्यांचे ताब्यातुन धारदार टोकदार चाकु, एक लोखंडी कटौनी व एक टॉमी, मिरची पावडर, दोरी तसेच, व ०४ मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे ६१,१५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांचे पळुन गेलेल्या साथीदारांचे नावे विचारली असता, त्यांनी पाहीजे आरोपी ५) आशिष उर्फ रविकुमार साह वय २८ वर्ष, ६) सचिनकुमार साह वय २८ वर्ष दोन्ही रा. लुगतचिया, जि. भागलपुर, बिहार असे सांगीतले. आरोपी हे घातक शस्त्रासह दरोडा टाकण्याचे तयारीत असतांना, समक्ष मिळुन आल्याने पोलीस ठाणे नंदनवन येथे फिर्यादी मसपोनि. मंगला हरडे, गुन्हेशाखा यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द कलम ३१०(४),३१०(५) भा.न्या.सं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून ०४ आरोपींना अटक केलेली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

तसेच यातील वरील गुन्हयातील अटक आरोपींचे साथीदार पाहिजे आरोपी १) रितीककुमार साह वय २२ वर्ष २) राजकुमार साह वय २३ वर्ष ३) धिरनकुमार साह वय २५ वर्ष ४) अमरकुमार साह वय ३० वर्ष सर्व रा. नौगचिया जि. भागलपुर, बिहार यांनी दिनांक ०४.०९.२०२६ रोजी दुपारी १३.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत प्लॉट क्र. ४९७, चिटणीस नगर, पंचवटी वृध्दाश्रमजवळ राहणाऱ्या फिर्यादी यांची आई श्रीमती पुषा निलकंठ तभाणे वय ७० वर्ष यांना घरातील जुने तांब्याची भांडी चमकवुन देण्याचे बहाण्याने स्वत:जवळील चांदीची अंगठी चमकावून दाखवून फिर्यादीचे आईचा विश्वास संपादन केला व त्यांची १४ ग्राम वजनी सोन्याची चैन कि. ७०,०००/— रु. ची चमकावून देण्याचे बहाण्याने हातचलाखीने, लबाडीने घेऊन फसवणुक करुन चोरून नेल्याचे

तसेच आरोपी यांनी दिनांक ०५.०९.२०२६ रोजी दुपारी १३.३० ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत न्यु शुक्रवारी, राम कुलरमागे राहणारे फिर्यादी श्रीमती उर्मिला विष्णुपंत शेंद्रे वय ७३ वर्ष या घरी एकटया असतांना, यातील आरोपी यांनी घरातील जुने दागिने व भांडी चमकवुन देण्याचे बहाण्याने स्वत:जवळील चांदीची अंगठी चमकावून दाखवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला व त्यांची १२ ग्राम वजनी सोन्याची चैन कि. ५५,०००/— रु. ची चमकावून देण्याचे बहाण्याने हातचलाखीने, लबाडीने घेऊन चोरी केल्याची माहिती दिली. आरोपींकडून दोन गुन्हे उघडकीस आलेले असुन गुन्हयातील पाहिजे आरोपींचा शोध सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. मंगला हरडे, त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.



**<u>४) इमामवाडा पोलीसांची कामगिरी :— एमडी पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०७.०९.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीता असतांना, पोलीस ठाणे हद्दीत एनआयटी गार्डन, सिरसपेठ येथे हिरव्या रंगाची विनानंबरची मोपेडजवळ दोन ईसम संशयीतरित्या दिसले व ते गार्डनचे आत गेल्याने, त्यांचेकडे जात असता, ते पोलीसांना पाहून पळाल्याने, त्यांचेपैकी एकाला ताब्यात घेतले. दुसरा पळून जातांना त्याचा मोबाईल फोन खाली जमीनीवर पडलेला मिळून आला. ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नाव, पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव गौरव रवि खंते वय ३२ वर्ष रा. जुनी मंगळवारी, जगन्नाथस्वामी मंदीरमागे, लकडगंज, नागपूर असे सांगितले. त्यास विनानंबरच्या बर्गमन मोपेडबाबत विचारपुस केली असता, त्याने उडवा—उडवीचे उत्तरे दिल्याने, त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन पंचासमक्ष त्याची व बर्गमन मोपेडची झडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिशात एक सिगारेट पाकीट व एक

झिपलॉक पॉकेट ज्यामध्ये एमडी पावडर मिळून आली. गाडीचे डिक्कीमध्ये इलेक्ट्रीक वजनकाटा मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एका झिपलॉक पन्नीत एकुण ७.८५ ग्रॅम एमडी पावडर, ०२ मोबाईल फोन, वजनकाटा, विनानंबरची बर्गमन मोपेड असा एकूण कि. १,४०,५००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस त्याचे पळून गेलेल्या साथीदाराबाबत विचारले असता, त्याने त्याचे नाव केतन सातनुरकर रा. इमामवाडा, नागपूर असे असल्याचे सांगुन खाली पडलेला मोबाईल फोन त्याचाच असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एमडी पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जयवंत पाटील, पोउपनि. आदित्य मडावी, अजय कव्हर, पोहवा संदीप बोरसरे, चंद्रशेखर कौरती, पोअं. जितेंद्र चौधरी, हरीश कांबळी, अजय मिरासे रंजीत सक्करवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे सिताबर्डी :— जिवानिशी ठार मारणारा आरोपी ताब्यात.</u>**

फिर्यादीचा भाऊ नामे आकाश सुरेश नेवारे वय २५ वर्ष रा. तेलंगखेडी, गोंडटोली खदान, मस्जिदजवळ, रविनगर, नागपूर याचा रविनगर चौक, बसस्टॉपजवळ एमएच ४० नावाचा पानठेला आहे व त्याची यापुर्वीची गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे. त्याचे वस्तीत राहणारे आरोपी १) पियुष उर्फ पेढा बघेल वय २२ वर्ष २) विशाल उर्फ बब्बु काल्या चचाणे वय २५ वर्ष दोन्ही रा. गोंडटोली, खदान, तेलंगखेडी, नागपूर ३) रंजीत उर्फ रंजु गोपाल महतो वय २५ वर्ष रा. सुदामनगरी, हिलटॉप अंबाझरी, नागपूर यांचीसुध्दा गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे व त्यांनी फिर्यादीचे भावास 'तेरे को दुकान लगाना है, तो हमको पैसे देना पडेगा' असे म्हणून त्याचे सोबत झगडा भांडण केले होते. त्याच कारणावरुन आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीचे भावास दिनांक ०७.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, देशपांडे सभागृहाचे मागे, सातपुडा लॉनचे बाजुचे गल्लीत, सिव्हील लाइन, नागपूर येथे धारदार शस्त्राने वार करुन त्यास जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी पकंज सुरेश नेवारे वय २३ वर्ष रा. तेलंगखेडी, गोंडटोली खदान, मस्जिदजवळ, रविनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि राहुल वंजारी ७०२८३६९३८१ यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१),३(५) भान्यासं. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपींचा शोध घेऊन आरोपी क्र. ३ व इतर दोन संशयीत इसमांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतराडी</u> :—** दिनांक ०६.०९.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत वर्धा रोडवरील न्यु पंजाबी ढाबा समोर, सर्व्हीस रोडचे बाजुला एक अनोळखी अंदाजे ४५ ते ५० वर्ष वयाचा पुरुष इसम, अंगात लाल काळी पांढरी रंगाची पट्टेदार हॉफ टिशर्ट व निळया रंगाचा पॅन्ट घातलेला, बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता एम्स् हॉस्पिटल, मिहान येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची ओळख पटलेली नाही. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. अमोल शिंदे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :–** दिनांक ०६.०९.२०२६ चे १४.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील मध्यवर्ती संग्रहालय, मिठानीम दर्गाहजवळील फुटपाथवर एक अनोळखी इसम अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयाचा, रंग–सावळा, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ७ इंच, डोक्यावरील केस–काळे पांढरे व वाढलेले, दाढीमिशी–काळी व वाढलेली, अंगात–पांढरा केसरी रंगाचा शर्ट व हिरवट रंगाचा पॅन्ट घातलेल्या वर्णनाचा, बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी गुलाम ताज फैजुल्ला शेख वय ५२ वर्ष रा. मिठानीम दर्गाहजवळ, सिव्हील लाईन, नागपूर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे सपोनि विनोद मांढरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**